**MHTH150005172022**

<u>सत्र खटला क्र.५६/२०२२ मधील</u>
<u>जामीन अर्ज निशाणी क्र.१३ खालील आदेश</u>
<u>सीएनआर:एमएचटीएच१५०००५१७२०२२</u>

<u>सत्र खटला/56/2022</u>

**१. श्री. दिलीप गोंदया वावरे,**
**२. श्री. केतन नारायण हेमाडा.** **....अर्जदार.**
(आरोपी क्र.१ व २)

**विरूध्द**

**महाराष्ट शासन**
**(बोईसर पोलिस स्टेशन तर्फे )** **...... सामनेवाला.**

**<u>निशाणी क्र.१३ खालील आदेश</u>**

अर्जदार यांच्याविरूध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७६—डी, ३६६, ५०६ सह—कलम ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

२. अर्जदारांनी फौजदारी प्रक्रिया सहिंतेचे कलम—४३९ प्रमाणे प्रस्तुतचा जामीन अर्ज दाखल केला आहे. या आधी अर्जदारांनी केलेले जामीन अर्ज फेटाळले गेलेले आहेत.

३. अर्जदारांचे वकील, सरकारी वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

४. फिर्याद व दोषारोप पत्राचे अवलोकन केले असता असे दिसते की, आरोपीने पिडीतेस पळवून नेले व तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. पिडीतेने ओळख परेडच्या दरम्यान अर्जदारांना ओळखले आहे. त्यामुळे माझे पुर्वाधिकारी यांनी फक्त आरोपी क्र.३ केतन रमेश लहांगे याचा जामीन अर्ज क्र. २२५/२०२२ मंजूर केला, कारण त्यास पिडीतेने ओळख परेडमध्ये ओळखले नाही.

५. आता अर्जदाराचे असे कथन आहे की, पिडीतेचा वैद्यकीय तपासणी अहवाल पाहता तो पिडीतेच्या कथनास पुष्ठी देत नाही. परंतू हि बाब वैद्यकीय अधिकाऱ्याची साक्ष झाल्याशिवाय मान्य करता येण्यासारखी नाही.

६. या अशा परिस्थितीत जर अर्जदारांना जामीन दिला तर, गुन्हयाचे स्वरूप लक्षात घेता हे पिडीतेवर दबाब आणण्याची शक्यता नाकारता येणार नाही. आता अर्जदाराचे असे कथन आहे की, सुमारे दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अर्जदार हे न्यायालयीन कोठडीत आहेत, परंतु हया एकाच मुद्दयावर ***कल्याणचंद्र सरकार वि. राजन उर्फ पप्पू यादव, २००४ कि. लॉ. जर्नल, १७९६*** या निकालाचे आधारे अर्जदारांचा जामीन अर्ज मंजूर करणे संयुक्तीक ठरणार नाही. त्यामुळे खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

अर्जदारांचा जामीन अर्ज निशाणी क्र.१३ फेटाळला,

सही/—

पालघर. (अ. श्री. प्रतिनिधी),

दिनांक : १२/०३/२०२४. अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पालघर.

Directly dictated & typed on dais computer : 12/03/2024.

Checked by the Judge on : 12/03/2024.

Finally printed and signed by the Judge on : 12/03/2024.